# प्रभुतरुण

| वर्ष ४७ | अंक २ | मुंबई | ऑगस्ट २०१३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## गेल्या दहा हजार वर्षात...

—सुहासिनी कीर्तिकर

वाचनाला सुरुवात कुठे केली,
दोन पाने वाचून जो न झाली;
तोंच हांसत मागून कुणी आले,
आणि पुस्तक तात्काळ जप्त केले.
‘पुरे गोष्टी वाचणे! करा गोष्टी!’
म्हणे, ‘फिरवा क्षणभरी वरी दृष्टी!’
क्षणी शिरिंची काढून तिने पात-
केवड्याची घातली पुस्तकात!
दिवस झाले त्याजला किती आता
सहज पुस्तक ये आज तेच हातां
केवड्याची त्यातली बघुनि खूण
सुखस्मृतिने मन जात गहिवरून!
जिथे वाचन एकदा थांबले ते
अडुनि बसले आहेच अजुनि तेथे!
फिरुनि फिरुनि उघडतो तेच पान
आणि प्रेमे हुंगितो तीच खूण!

मित्रहो, कुणाची ही कविता? ‘स्मृतीची चाळता पाने’ काही कळतंय? अशा आठवांच्या कविता म्हटलं की आठवतात इंदिरा संत. त्याच तोडीची ही ‘पुस्तकातील खूण’ जपणारी किती सुंदर कविता! कुणाची? नाही आठवत? अहो, आचार्य अत्रे; म्हणजे ‘केशवकुमारां’ची. ज्यांच्या अशा कविता वाचून वसंत बापट म्हणून गेले, ‘गीतगंगा लिहिणारे अत्रे कोठे आहेत? त्यांना सांगा, त्यांनी हरवता कामा नये. स्थूल रूपाने, सूक्ष्म रूपाने, पण त्यांनी असायला हवे.’ तेरा ऑगस्ट हा आचार्य अत्रे यांचा जन्मदिन. केवळ साहित्यातीलच नव्हे; तर शिक्षणातील, राजकारणातील एक पर्व गाजवलेले प्रल्हाद केशव अत्रे यांची आठवण आपल्या मनी केवळ वरळीतील त्यांच्या अर्धपुतळ्याभोवतीच आपला ‘पुतळा’ होऊन अडकू नये! आपल्या एकाच व्यक्तित्वात बारा अत्रे आहेत ही माहिती अत्र्यांनीच सांगितली होती. ती आज ‘बाराच्या भावात’ जाता कामा नये! ‘यमुनाजळी खेळू खेळ कन्हय्या का लाजता?’ या त्यांच्या चित्रपटगीतातील शेवटची ओळ आपण वाचक रसिकांनी मनात घोळवत म्हटले पाहिजे-

‘बहिमोल अशी ही वेळ
अरसिका का दवडिता?’

तर मित्रहो, जराही वेळ न दवडता त्यांचे ‘बारा गावचे पाणी’ प्यालेले ‘बारा’ती व्यक्तिमत्व आठवायचं का जरासं? आठवूयाच. कवीपेक्षाही विडंबनकवी म्हणून त्यांनी बहार उडवून दिली होती. त्यांची ‘झेंडूची फुले’ कोण विसरेल? ‘रवीकिरण मंडळाची खिल्ली उडवत लिहिलेली ‘रस्त्यावर पडलेले विडीचे थोटूक!’ सारखी लंब्या शीर्षकाची कविता, तशीच ‘कषाय-पेय-पात्र-पतित मक्षिकेप्रत-’ (म्हणजे ‘चहाच्या पेल्यात पडलेल्या माशीस’ बरं का)

ही कविता गाजलेली. (श्यामलेस) कविता की ज्यात ‘तू छोकरी नहि सुन्दरी! मिष्कील बाल चिचुंदरी’ असे सुंदरीचे ‘चिचुंद्री’ वर्णन आहे... अशा कवितांतून केशवकुमारांनी व्यंगावर वर्मी घाव घातलाय्. बरं, हा घाव जखम करीत नाही. ‘लाफ्टर थेरपी’नं अंतर्मुख करत जातो.

हीच ‘लाफ्टर थेरपी’ अत्र्यांनी आपल्या पहिल्याच नाटकात वापरली आणि मराठी रंगभूमीला ‘साष्टांग नमस्कार’ घातला. लकवा मारलेल्या मराठी रंगभूमीला त्याने संजीवन मिळाले. औंधच्या संस्थांनाधिपतींचे इस्पितळात असतानाही साष्टांग नमस्कार घालण्याचे वेड (म्हणजे ते त्यांनी ‘मनातल्या मनात’ घातलेले!) कविवेड, प्रेमवेड, बालवेड आदीत कालवून विनोदाचे एक उत्तम रसायन तयार करून ‘साष्टांग नमस्कार’ तयार झाले. मग जवळजवळ चाळीसेक वर्षे त्यांनी समाजावर कोरडे ओढत हा नमस्कार घालणे चालूच ठेवले. ‘उद्याचा संसार’ ही शोकांतिका, ‘स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळची माता असते’ किंवा ‘सुखाला सोबत लागते, दु:खाला एकटेपणानंच जगावं- किंवा मरावं लागतं!’ अशी सार्वकालीक सत्यं

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## In Search Of The 'Reset Button'!

**- Mayura Nayak**

'Faith' and 'blind faith' are two very strong words that come out of the same emotion, the same word but can have diverse effects on us because they are either a result of a combination of experiences or a higher degree of unconditional emotions or merely a trust in hearsay or myths! We interact with people in our lives and with various positive or negative experiences we start trusting these very people with wide levels of affection - we develop what we call 'faith' in people. Everyday we stand in front of the Almighty thank him for what he has given us and very often ask for some blessing in the form of health, wealth or well being and when we get it from Him it strengthens our 'faith' in Him sometimes converting it into blind faith! There are certain people in whom we implicitly trust because they have provided their unconditional love and affection towards us in action and words. We then reciprocate similarly to those feelings and thus blossoms a relationship which keeps building on mutual trust, faith and love. When there is such a background to any relationship 'faith' becomes an integral aspect of that relation and slowly at times graduates towards blind faith. But what happens to that trust we instil in age old beliefs, customs, and superstitions which arise out of just hearsay or mere age old practices? So is this termed as blind faith as well? or a better term could be 'myth faith' So we humans start having faith in myths which are age old superstitions and practices and which today hold no scientific relevance.

Well this myth faith does arise out of teachings passed on from those people on whom we have had immense trust and faith. But have we ever asked the question why before we follow some of these age old superstitions?

Very often customs and traditions are connected with auspicious occasions like weddings and festivals. These customs and traditions help us bond with our people, they strengthen our value system, they help keep our respective community together because they distinguish us from the rest of the people who follow their own sets of traditions. In totality these traditions encourage positivity and spread happiness during those times of the year when we are all looking forward to sharing some memorable moments with the people we love and care. So one may ask why question such wonderful practices! To which I completely agree! I am absolutely in favour of practicing such traditions which help and encourage us to bond and further enhance our relations.

But there are a few superstitions which we Indians follow in the name of customs and traditions which are probably just myths! Myths that spread negativity and gloom.

A myth that generates fear - a black cat crossing our path is inauspicious! Many of us know that it's a myth but a lot of us still hold ourselves back if a black cat does cross our path and especially if we probably are on our way for an interview. If biologically the poor cat has inherited that colour, and happens to take the same route as us, how can there be a scientific justification of this incident being a bad omen?

Cutting nails or hair post sunset or sweeping the house after sunset is termed inauspicious. Well most often we never sweep at night but if there is a one off day when we have to then will that day be a dooms day just because we swept the floor? How can a hygienic practice of cutting nails be a bad omen irrespective of the time? Do the nails have any sensors that indicate the time of the day?

(पान ४ कॉलम १ वर)

(पान १ कॉलम २ वरून)
सांगत त्यांनी लिहिली. पण त्याबरोबर हलकीफुलकी 'भ्रमाचा भोपळा', 'लग्नाची बेडी' सारखीही नाटकं लिहिली. 'तो मी नव्हेच'मधील सामाजिकता तर ढोंगाच्या सोंगावरच उभी आहे.

असे ढोंग लोकांसमोर टराटरा बुरखा फाडून उभे करणे हा त्यांचा 'अत्रेय' धर्मच होता. त्यांच्यातला वक्ता अशावेळी खडबडून जागा असे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या काळातील शिवाजी पार्कवरील त्यांची भाषणे माझी पिढी कशी विसरेल? 'तुफानी वक्ता' हेच त्यांचे विशेषण. मग पहिले महाराष्ट्र कविसंमेलनातील स्वागताध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले अप्रतिम भाषण असो, 'ब्रॅन्डीच्या बाटली'मधील विनोदावर श्री. म. माट्यांनी आक्षेप घेतल्यावर माट्यांना उत्तर देणारे जाहीर सभेतील खोचक-रोचक भाषण असो, खिल्ली उडवत उडवत मुद्दे मांडत अत्र्यांचा 'महाकाय' भाषणाचा धबधबा श्रोत्यांना चिंब करून जाई. 'दशसहस्त्रेषु' असाच हा वक्ता.

कारण वक्तृत्वाला ह्यांचेजवळ फक्त 'वाणी' नव्हती. प्रतिपक्षाला, प्रतिस्पर्ध्याला चीतपट करण्याचे कसब होते, कर्तृत्व होते. पत्रकारिता होती. सामान्य माणसाला भाषा कशी कवेत घेईल अशी जाण होती. त्यांच्या 'मराठा'ने तर इतिहासच घडवला. विजय तेंडुलकरांसारखा लेखकही त्यांच्याकडे काम करताना सोपी भाषा कशी लिहावी याचे धडे घेता झाला. (त्यांचा 'साहेब' लेख या संदर्भात आठवतोय्.) 'मराठा' हे नुसते 'पत्र' नव्हते; तो एक पंथ (कल्ट) होता. 'ये स्वातंत्र्या ये' हा त्यातील लेख किंवा 'वाहवा वाहवा नेहरू हा' असे विडंबनाचा विषय झालेले पंडित नेहरू गेले तेव्हा एक, दोन नव्हे; तब्बल तेरा संपादकीये लिहून 'सूर्यास्त' दाखवणारे त्यांचे लेख, मोरारजीभाईंच्या धोरणाची खिल्ली उडवणारे त्यांचे लेख म्हणजे 'वर्तमानपत्रे ही उद्याची रद्दी' हा समज तद्दन खोटा ठरवणारेच होते. पत्रकारितेला लागणारी धाडसी वृत्ती, खणखणीत लेखणी, संपादकाची कणखर भूमिका, 'सख्या हरी'सारखी माणसं जोडणारी वृत्ती, तत्त्वनिष्ठा, निर्भयता, राष्ट्रप्रेम त्यांच्याजवळ मूर्तिमंत होतं. त्यामुळं पत्रकारिताच नव्हे; त्यांनी ज्या क्षेत्रात पाऊल टाकलं त्यात त्यांचा 'मिडास' ठसा ते उमटवत गेले.

म्हणूनच 'सानेगुरुजीं'वर ते अप्रतिम लिहून गेले. गाडगेबाबांनी स्वत:च्या कार्याचा कुठंही गाजावाजा केला नाही. पण अत्र्यांच्या लेखणीनं गाडगेबाबांचे कीर्तन-कार्य गाजत ठेवले. व्यक्तीचित्रण करताना वास्तवाला सामोरं जाणं, व्यक्तीचा विविधांगी वेध घेणं, 'माणूसपण' जपणं अन् नेमक्या कोनातून त्यांना निबंधात उतरवणं ही सोपी गोष्ट नाही. पण अत्र्यांच्या वृत्तीला, लेखणीला अशक्य ते काय? दत्तो वामन पोतदार, अनंत हरी गद्रे, श्री. म. माटे यांच्यावर लिहिलेल्या त्यांच्या लेखांचीही साक्ष काढता येईल.

साक्ष काढायची तर 'संपादकीया'ची पाने अपुरीच पडावीत! त्यांनी केवळ विडंबने केली नाहीत. विनोदी कथाही लिहिल्यात. या कथांचा पुढे त्यांना विनोदी चित्रपटांसाठी 'मूळ जिन्नस' म्हणून उपयोग झाला. 'सार्वजनिक जीवन', 'माझा व्यापार'सारख्या त्यांच्या विनोदी कथा सर्वसामान्य वाचकाला नसतील कदाचित् ठाऊक, पण 'ब्रॅन्डीची बाटली'? (ती तर न वाचताही कदाचित् अनेकांना ठाऊक असेलच!) तर 'ब्रॅन्डीची बाटली' ही साध्याभोळ्या सज्जन, परोपकारी माणसाला सामाजिक चक्कर आणणारी कथा. औषध म्हणून शेजारच्या नाकाला सूत धरलेल्या मुलाकरिता ब्रॅन्डी हवी असते अन् कथानायक बिचारा ब्रॅन्डी म्हणजे काय ते माहीत नसल्यामुळे औषधालयापासून गुत्यापर्यंत भटकतो. त्याची ही कथा.

पुढे दामूअण्णा मालवणकरांना घेऊन हा साधा भोळा नायक अत्र्यांनी त्याच नावाच्या चित्रपटात दाखवला.चित्रपटकथा अत्र्यांची. संवाद अत्र्यांचे. गीते अत्र्यांची. दिग्दर्शन अनेकवेळा अत्र्यांचे. काहीत भूमिकाही त्यांची अन् निर्मातेही अत्रेच. 'चित्रपटकार अत्रे' हा त्यांचा वेगळाच पैलू. 'श्यामची आई'ने त्यांना चित्रपटसृष्टीतील पहिले सुवर्णकमळ मिळवून दिले अन् वनमालाही! अत्र्यांनी सर्वच क्षेत्रात असा सुवर्णकाळ घडवला. 'धर्मवीर' त्यांचाच चित्रपट अन् त्यातील 'घ्या हो घ्या हो कुणी माझी फुले ताजी' सारखे त्या काळच्या तोंडी खेळणारे गीतही त्यांचेच. त्यांचा मीनाक्षीच्या वेषभूषेमुळे गाजलेला 'ब्रह्मचारी' निखळ करमणूकच होता. अर्धांगी, लपंडाव... असे अनेक चित्रपट गाजले. 'नवयुग' त्यांनी घडवले!

नवयुग का म्हणायचे; अत्रेयुगच होते ते. 'विनोदाचे तत्त्वज्ञान', 'सौंदर्य, कलावंत आणि समाज' सारखे त्यांचे निबंध म्हणजे समीक्षेचा उत्कृष्ट नमुनाच. अशावेळी त्यांची लेखणी 'चाफा फुली आला फुलून'च येई. (या शीर्षकाचा त्यांचा निबंधच आहे.)

समीक्षेला लागणारी सर्वगामी गुणग्राहक लेखणी अन् वृत्ती त्यांच्यापाशी होती. म्हणूनच प्रवासवर्णन असो, समीक्षा असो, पत्रकारिता असो; ते त्या त्या क्षेत्रात स्वैरसंचार करीत. 'कारवारचे साहित्य संमेलन' हा त्यांचा प्रवासवर्णनपर निबंध आठवा; किंवा मग 'सानेगुरुजींच्या जन्मभूमीत'. त्यांच्या प्रवासासोबत आपणा वाचकांचाही सहप्रवास होतो. आजही. याला कारण त्यांची उपभोगाची समरसता, त्यांची बहुप्रसवा शैली, जन्मजात लाभलेला बुद्धीचा वरदहस्त आणि समाजमानसात शिरण्याची त्यांची हातोटी.

बुद्धीचा वरदहस्त तर त्यांना होताच. बी.ए.ला ते पहिल्या वर्गात सर्वप्रथम होते. शिक्षणक्षेत्रात 'जरा विसावू या वळणावर' म्हणत ते शिरले. 'बी.टी.'केले. तेथेही ते प्रथम वर्गात सर्वप्रथम! शाळेत शिक्षक म्हणून मुलांसाठी त्यांनी नाटुकले लिहिली. नवीन उपक्रम राबवले. शिक्षणाला वळण लावणारी नवीन क्रमिक पुस्तके 'नवनीत पुस्तकमाला' तयार केली. बी.टी. करत असतानाचा त्यांचा पाठप्रयोग जुनी पिढी चघळत चघळत सांगत असे. वर्गात शिक्षणपाठ घेताना प्रात्यक्षिक करायचे असते. अत्रे इंग्रजीचा व्याकरणपाठ घेत होते. 'आय अॅम स्टॅंडिंग' हे वाक्य त्यांनी खुर्चीतून उभे राहून, प्रात्यक्षिकाद्वारे दाखवले. पुढचं वाक्य- 'आय अॅम स्लीपिंग'चं प्रात्यक्षिक? समोरच्या टेबलावर हा शिडशिडीत (हो! त्याकाळी ते महाकाय नव्हते.) उंचकाठीचा शिक्षक चक्क आडवा झाला अन् म्हणाला, 'आय अॅम स्लीपिंग' हा पाठ पाहणाऱ्या निरीक्षकतज्ञांची झोपच उडाली की हो! पुढं हेच अत्रे शाळेचे मुख्याध्यापक होत 'प्राचार्य अत्रे' झाले. लंडनला 'टी.डी.' पदवी घ्यायला गेले. 'बी.ए., बी.टी., टी.डी.लंडन' ही शेपूट अनेक वर्षे त्यांच्या नावामागे ते बाळगीत.

पण अशा अनेक शेपट्या त्यांनी प्रत्येकवेळी नवीन शेपटी जोडत कापून टाकल्या. 'मी कोण आहे?' या आत्मवृत्तात त्यांनी याचा वेध घेतलाच आहे. 'माझ्या नाट्यलेखनाचा प्रारंभ' यातही हा वेध घेताना त्याकाळची सामाजिकता अन् 'साष्टांग नमस्कार'ची जन्मकथा रंगवून सांगितली आहे. आत्मवृत्त लिखाणात ते येथेच नाही थांबले. 'कऱ्हेचे पाणी' दोन खंडात त्यांनी वाहते ठेवले. असे निर्मळ आत्मवृत्त याआधी मला वाटते फक्त 'सत्याचे प्रयोग' हेच असेल. नंतर 'कऱ्हेचे पाणी'च. या कऱ्हेच्या काठी, अत्र्यांच्या जन्मगावी सासवडला अ.भा. मराठी साहित्य संमेलन भरतेय. ते भरू द्या हो. पण तेरा ऑगस्टच्या त्यांच्या जन्मदिनी त्यांची 'अष्टपैलू; नव्हे; नव्हे;अनेक पैलू महानतेची आठवण जागवूया. (थोडीशी ज्ञातीय जवळीक होतीच त्यांच्याशी. ॲड. सदाशिव धुरंधर हे त्यांचे कायदे सल्लागार होते. ऐनवेळी कोर्टातील प्रकरणात बाजू लढवायला 'धुरंधर'सल्ला त्यांना उपयोगी पडायचा. व्ही. जी. राव त्यांचे मित्र होते.त्यांच्या कुटुंबीयांनी 'न पाहिलेले अत्रे' पुस्तक साकारले. 'प्रभुतरुणा'तर्फे त्याचे प्रकाशनही झाले. सुधाताई अत्रे या अमरावतीच्या शाळेत शिक्षिका होत्या. माझी आईदेखील तेथे (विवाहापूर्वी) शिक्षिका होती. त्यामुळे ती सुधाताईंचा 'मिस मुंगी' असाच उल्लेख करायची. अत्रे मिस मुंगीला भेटायला हरिभाऊ मोट्यांबरोबर वारंवार तेथे जायचे.त्यांचा तो प्रेमबहराचा काळ होता. शिक्षिकांच्या वसतीगृहातली खोली त्यांचे भेटीचे संकेतस्थळ होते. त्यामुळे याबाबतीत सर्व शिक्षिका मिस मुंगीच्या 'वल्लरी' होत्या. मिस मुंगीच्या लग्नानंतर ती सुधा होऊन आमच्या घरीही एकदा आली होती. पण हे सगळे आपले 'तेवढेच ज्ञानप्रकाशात'च्या थाटात बरं का. माहित्येय् ना दिवाकरांची 'तेवढेच ज्ञानप्रकाशात' ही नाट्यछटा?)

आचार्य अत्र्यांच्या स्मृतिला वंदन करताना त्यांचेच शब्द त्यांना सार्थपणे ऐकवूया- 'गेल्या दहा हजार वर्षात असा' असामी झाला नाही!

*

## पाठारे प्रभु सोशल समाज

❁ या संस्थेचा वार्षिक अहवाल प्राप्त झाला.

❁ १९ जुलै रोजी व्यंकटेश मंदिरात समाजाची 'अभंगयात्रा' दिमाखात साजरी झाली. दरवर्षीप्रमाणे या अभंगयात्रेत अनेक ज्ञातीय गायक सहभागी झाले होते. सूत्रसंचालन समाजाच्या उपाध्यक्षा श्रीमती स्वाती राणे यांनी बहारदार केले.

❁ २८ जुलैला समाजाची एक दिवसीय वर्षासहल महडच्या गणपतीचे दर्शन घेऊन रिसॉर्टमध्ये साजरी झाली. रेनडान्स, विविध खेळ, भोजन आदीमध्ये सर्वांनी आनंददायी सहभाग घेतला. आयोजकांनी या सहलीचे नेटके आयोजन केले होते. या सहलीला वाढता प्रतिसाद लाभतो आहे.

*

## पाठारे प्रभु महिला समाज

स्त्री शक्तीस सलाम करीत पाठारे प्रभु महिला समाजाचा वार्षिक अहवाल (२०१२-१३) सर्व सदस्यांना प्राप्त झाला. उचित, आकर्षक मुखपृष्ठ आणि हिशोब असलेला हा अहवाल महिला समाज यशस्वी शताब्दी साजरी करेल; याचा विश्वास देणारा आहे.

समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १८ ऑगस्ट २०१३ रोजी प्रभु सेमिनरी शाळेचे सभागृहात सायंकाळी ४.०० वाजता होणार आहे. याचदिवशी महिला सभासदांसाठी खालील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

महिलांसाठी मराठी वक्तृत्व स्पर्धा-

(पान ४ कॉलम ३ वर)

लेखांक-८

# फुलता नलिनी दल

## ‘उष:काल होता होता काळरात्र झाली’

— नलिनी तळपदे

‘‘स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंतकाळाची माता असते.’’

‘‘स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी’’

‘‘प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधु आई’’

‘‘देव जरी मज कधी भेटला, माग हवे ते माग म्हणाला,

‘‘म्हणेन प्रभु रे, माझे सारे जीवन देई मज बाळाला’’

आचार्य अत्रे, कवी यशवंत, माधव ज्युलियन, ग. दि. माडगुळकरांसारख्या दिग्गजांनी आईचं हे प्रेम, सोज्वळ रूप डोळा भरून पाहिलं आहे. आणि ते खरंच आहे. प्रत्येक ठिकाणी जाणं शक्य नसल्यामुळे साक्षात् ईश्वरानं जिला आपलं उत्तरदायित्व दिलं आहे ती तुमची आमची सर्वांची आई ही अशीच असते.

अशा माता पशुपक्षातदेखील असतात बरं का- घार हिंडते आकाशी, परी लक्ष तिचे पिल्लापाशी असते असं म्हणतात. ‘केवढे हे क्रौर्य’ या कवितेत रेव्हरंड टिळकांनी शिकाऱ्याच्या बाणांनी घायाळ झालेल्या, अशा रक्तबंबाळ अवस्थेतही चोचीतला चारा पिल्लांच्या मुखात घालण्यासाठी धडपडणाऱ्या पक्षिणीचं हृदयस्पर्शी वर्णन केलं आहे. त्या मातेच्या प्रबळ इच्छाशक्तीपुढे प्रत्यक्ष काळालाही नतमस्तक होऊन पिल्लांच्या चोचीत घास भरवण्याइतका अवधी द्यावा लागला. कुत्र्या, मांजरासारखे पाळीव प्राणी किंवा वाघ सिंहासारखे हिंस्र पशूही आपल्या अपत्यांचे लालनपालन मायेनं करतात. कळपातून बाहेर पडून वाट चुकलेल्या कोकराला परत आणण्यासाठी त्याची आई जीवाचं रान करते. त्यावेळी सावज म्हणून आपण आलगद शिकाऱ्याच्या जाळ्यात सापडू याचीही तिला तमा नसते. तिचं लक्ष केंद्रीत झालेलं असतं ते आपल्या बाळावर. कारण तोच तर तिचा विसावा, विरंगुळा असतो.

सुसरीला देण्यासाठी आईचं काळीज कापून नेतांना वाटेत ठेच लागून पडणाऱ्या मुलाला पाहून ‘बाळा तुला लागलं तर नाही ना?’ असे शब्द आईच्या काळजातून उमटले. हे अतिरंजित वाटलं तरी अवास्तव नक्कीच नाही. कारण मुलं कितीही असोत, प्रत्येक मूल आईच्या काळजाचा घड असतं.

मग त्या माकडिणीची गोष्ट?

पाण्याच्या लोंढ्यात वाहून जाऊ नयेत म्हणून पिल्लांना पोटाशी धरणारी माकडीण पाण्याची पातळी वाढल्यावर त्याच पिल्लांना पायाखाली घालून आपला जीव वाचवण्याची पराकाष्ठा करते. खरं खोटं देव आणि ती माकडीण जाणे, पण हे ऐकून मन मात्र उद्विग्न होतं. ते या गोष्टीवर विश्वास ठेवायलाही धजत नाही. सख्खी आई, प्रत्यक्ष जन्मदात्री असं वागू शकते? नाही ना विश्वास बसत? पण सत्य हे कल्पितापेक्षाही अद्भूत असतं. ईश्वरानं तिला आपलं उत्तरदायित्व दिलं तरी; देवत्व दिलं नाही. तीही माणूसच आहे. राग, लोभ, चीड, संताप, द्वेष, अविवेक, नैराश्य, पराकोटीची वैफल्याची भावना याचा उद्रेक झाल्यावर अशी कृत्यं आता वारंवार घडू लागली आहेत. मातृप्रेमाची महती गाताना मधेच ठसका लागून पुढचे शब्दच सुचू नयेत असं काहीसं या बातम्या वाचून वाटतं.

नुकत्याच जन्मलेल्या, आईशिवाय कुणाची ओळखही न झालेल्या तान्हुल्यांना त्यांच्या रडण्याचा त्रास होऊन पाण्याच्या टाकीत बुडवून मारणारी आई, घरातील कटकटीला कंटाळून गाढ झोपेत असलेल्या बाळाच्या अंगावर रॉकेल टाकून त्यांना पेटवणारी आई, नवऱ्याबरोबर भांडण झालं म्हणून तोंडावर उशी दाबून मुलीचा जीव घेणारी आई, दोन सानुल्यांना पाण्याच्या पिंपात बुडवून स्वत:ला गळफास लावून आत्महत्या करणारी आई, मुलांच्या अर्ध्या समजत्या वयात त्यांना बाहेर जाण्याच्या निमित्ताने घराबाहेर काढून काही कळायच्या आत त्यांना गच्चीवरून ढकलून स्वत: उडी मारून जीव देणारी आई.

या सर्व मातांना त्यांच्या करंटेपणाची, ईश्वरानं दिलेल्या सर्वश्रेष्ठ दानाचा अव्हेर केल्याची शिक्षा मिळेलच. प्रश्न आहे तो त्यांच्या पोटी आलेल्या त्या कोवळ्या अश्राप जीवांनी असा काय गुन्हा केला होता; म्हणून त्यांच्या आयुष्यात उष:काल होता होता ही काळरात्र आली?

वरील सर्व घटना सत्य असल्या तरी आकलनशक्तीपलीकडच्या आहेत. उत्तर नसलेल्या प्रश्नांचा मनांत गुंता होऊन राहिला आहे.

खिडकीतून वाकून बाहेरची गंमत पाहणाऱ्या बाळाला, ‘अरे पडशील ना राजा’ असं म्हणून जवळ घेणारी आई, स्वत:च्या हातानं उंच इमारतीवरून मुलांना ढकलू शकेल? रडणाऱ्या तान्हुल्यांना कुशीत घेऊन जोजवणारी आई त्यांच्या रडण्याचा त्रास वाटून त्यांना पाण्याच्या टाकीत बुडवून त्यांचा जीव घेईल? गाढ झोपेत असलेल्या बाळाच्या अंगावरून मायेनं फिरणारे हात त्यांच्या अंगावर रॉकेल ओतू शकतील? आंघोळ घालतांना नाकातोंडात पाणी जाऊन रडणाऱ्या बाळांना कुशीत घेऊन समजावणारी आई त्यांना पाण्याच्या पिंपात स्वत:च्या हातानं बुडवू शकेल?

छे! या सर्वजणी मनानं खचलेल्या, पराकोटीच्या वैफल्यानं ग्रासलेल्या, निराशेच्या गर्तेत सापडून मानसिक संतुलन हरवून बसलेल्या असाव्यात. मला तर वाटतं, त्या क्षणापुरती त्यांची सारासार विचारशक्ती, वात्सल्य, मातृहृदय संमोहित करून कुठलीतरी अमानुष शक्ती त्यांच्याकडून हे कृत्य करवून घेत असावी. नाहीतर कुठली जन्मदा-म्हणजेच जन्म देणारी, जीव घेणारी होऊ शकेल का?

बाळाच्या जन्मानं आईची कूस धन्य होते, असं म्हणतात. तीच कूस उजाड करणारे हात प्रत्यक्ष जन्मदात्रीचे असू शकतील? छे! एकामागून एक घडणाऱ्या, मती गुंग करणाऱ्या या घटना वाचून वाटतं, या माता मातृदेवता नसून निरपराध जीवांचा बळी घेणाऱ्या त्याच्या साता जन्माच्या वैरिणीच असाव्यात.

रामावर भरताइतकं निस्सीम प्रेम करणाऱ्या कैकयीनं केवळ भरताला राज्याभिषेक व्हावा म्हणून मंथरेच्या सांगण्यावरून रामाला वनवासात धाडण्याचं जे कपटकारस्थान रचलं त्यामुळे संतप्त होऊन भरतानं ‘माता न तू वैरिणी’ या शब्दात तिचा धिक्कार केला. तो हे बोलू शकला कारण तो सुजाण होता. पण या अजाण अर्भकांचं, आईचा पदर धरून तिच्या अवतीभवती फिरणाऱ्या चिमुकल्या जीवांचं काय?

आईचा मुखवटा धारण करून प्रत्यक्ष काळ आपला घास घेण्याच्या संधीची वाट पाहात आपल्याभोवती वावरत आहे हे त्या बाळजीवांना कसं कळावं?

खरं तर मुलं म्हणजे देवाघरची फुलं. त्यांना नीट उमलण्याआधीच खुडण्याचा, चुरगाळून फेकून देण्याचा अधिकार यांना दिला कुणी? या कृत्याला इथे क्षमा नाही, आणि देवाच्या दरबारात तर नाहीच नाही. असो. या काही अपवादात्मक मातांमुळे इतर मातांची थोरवी कमी होत नाही. या सर्व मातांच्या चांगुलपणाचं प्रातिनिधीक स्वरूप म्हणजे ‘श्यामची आई’. या श्यामच्या म्हणजेच सानेगुरुजींच्या आईनं तर आमच्या पिढीवर जबरदस्त मोहिनी घातली होती. या पुस्तकाच्या पारायणामुळे तिचं हसणं, रुसणं, वागणं, बोलणं, तिची शिकवण, शिस्त, मुलांविषयीचं प्रेम, तळमळ सगळं अगदी खोलवर मनात रुजून तिच्याविषयीच्या आदरानं मन भरून येतं.

अशीच एक, आता इतिहासजमा झालेली, कधी न पाहिलेली पण मनात घर करून राहिलेली साधीसुधी आई-हिरकणी गवळण. गडाचे दरवाजे बंद झाल्यावर मुलाच्या ओढीने उंच बुरुजावरून उडी मारून घर गाठणाऱ्या हिरकणीला प्रत्यक्ष शिवरायांनी साडीचोळी देऊन मानाचा मुजरा केला. इतकंच नव्हे तर, त्या बुरुजाला हिरकणीचं नाव देऊन एका आईचा यथोचित सन्मान केला. मी तर म्हणेन मातृत्व निभावता येत नसेल तर ते स्वीकारुही नका. म्हणजे तरी त्या चिमण्यांच्या आयुष्यात उष:काल होता होता काळरात्र येणार नाही.

*

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# नाबाद नव्वद

नव्या तरुणाईला लाजवेल अशा उमेदीने आपल्या ज्ञातीतील चिरतरुण कार्य करीत आहेत. श्री. प्रताप वेलकर यांचे वयाच्या नव्वदीनंतरचेही आपली उमेद वाढविणारे कार्य चालू आहे. श्री. रवींद्र मानकरांचेही तेच. ते प्रभुतरुण, पा. प्र. चॅरिटीज या संस्थांचे सर्वकाळ तरुण असे कार्यरत 'आधुनिक देवानंद' आहेत. आपली उमेद वाढविणाऱ्या अशा चिरतरुण कार्यकर्त्यांमधले आणखी एक ठळक नाव म्हणजे डॉ. गजानन वामनराव विजयकर. १७ जुलै २०१३ रोजी त्यांनी वयाची नव्वद वर्षे पुरी केली. 'श्वास आहे म्हणून केवळ जगतोय अशी माणसे मृतवत् असतात' असं एक संस्कृत वचन आहे. याला अर्थातच अपवाद आहेत डॉ. गजानन विजयकर. पूर्वसुरींचा संस्कार, समाधानी कुटुंबवत्सलता, मानवतावादी यशस्वी डॉक्टरीपेशा आणि धीरोदात्त वृत्ती यांनी डॉ. गजाननरावांचे व्यक्तित्व आदर्शवत् घडवले आहे. त्यांचे आजोबा आनंदराव विनायक विजयकर हे चॅरिटीजचे विश्वस्त



होते. तोच वारसा डॉ. गजाननरावांनी चालवत गेली वीस वर्षे ते चॅरिटीजचे विश्वस्त आहेत. विश्वस्तपदी विराजमान होऊन ते केवळ 'आश्वस्त' झाले नाहीत. तर ते अखंड कार्यरत आहेत. ज्ञातीयांसाठी चॅरिटीजतर्फे पुढाकार घेऊन त्यांनी ४३ आरोग्यचाचणी शिबीरे यशस्वीपणे घेतली आहेत. त्यासाठी ज्ञातीतील आणि ज्ञातीबाहेरील निस्पृह डॉक्टरांची ते मदत घेतात. समाजकार्य करण्यासाठी असा निस्पृहांचा गोतावळा जमा करणे सोपी गोष्ट नाही. पण पाठारे प्रभु नर्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून केलेल्या कामामुळे त्यांना ही किमया साध्य झाली. पाठारे प्रभुंकरिता ते आणि त्यांचे अवघे घरच या कामात सहभागी असते. म्हणजे 'आपणासारिखे करिती तात्काळ' हा गुण त्यांच्या मृदू बोलण्याने, वागण्याने त्यांनी आत्मसात केला आहे.

म्हणूनच आपले ज्ञान, व्यक्तिमत्व, समाजसेवेची ऊर्जा यातून ते ज्ञातीबाह्य समाजसेवेसाठीही बांधले गेले आहेत. इंडियन मेडिकल असोसिएशनचे ते सदस्य आहेत आणि एकेकाळी कोषाध्यक्षही राहिलेले आहेत. डॉ. प्रफुल्ल विजयकर होमियोपाथी रीसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशनचे ते विश्वस्त आहेत. तसेच वांद्रे येथील शारदा संगीत विद्यालयाचेही विश्वस्त आहेत. त्यांचा शास्त्रीय संगीताचा अभ्यास आहे. पंडित लक्ष्मणप्रसाद शुक्लांकडे त्यांनी हे संगीत आत्मसात केले. आता नुकतेच पलुस्कर स्मृती प्रतिष्ठान सुरू करण्यात आले आहे. त्याचे ते संस्थापक सदस्य आहेत. या वयातही आयुष्यातील सर्व ज्ञान-कला विभागात त्यांना रुची आहे. आजही अंधेरी येथील त्यांच्या दवाखान्यात ते एक दिवसाआड जातात. रुग्णसेवा करतात. त्यांच्या कार्याबद्दल पा. प्र. चॅरिटीजने त्यांचा सत्कार करून सन्मानपत्र बहाल केले ते उचितच.

'सगुण चरित्रे परम पवित्रे आदरे वर्णावी।' असे म्हणतात.

डॉ. गजानन विजयकरांचे हे परम पवित्र सगुण चरित्र, आपल्यालाही ऊर्जा देणारे ठरो. त्यांच्या आयुष्यातील 'नवतीत सोहळ्या'-साठी त्यांचे प्रभुतरुणातर्फे मन:पूर्वक अभिनंदन. कार्यरत शताब्दीसाठी शुभेच्छा. शुभम् भवतु।

---

(पान २ कॉलम ४ वरून)

विषय: पावसाळा आणि मुंबईचे रस्ते.
मुलींसाठी मराठी वक्तृत्व स्पर्धा- विषय: मला आवडलेले पुस्तक (द बेस्ट बुक एव्हर रेड)

महिलांसाठी हिंदी वक्तृत्व स्पर्धा- विषय: मेरी सफर.

स्मरणशक्ती स्पर्धा-

सामान्यज्ञान स्पर्धा- ही स्पर्धा दोन वयोगटात असेल.

इच्छुकांनी ३१ जूलै, २०१३ पर्यंत शिष्यवृत्तीचे अर्ज भरावेत. हे अर्ज सौ. मेघना राणे यांच्याकडे द्यावेत. तसेच मुलींच्या पदव्युत्तर शिक्षणासाठी महिला समाजाचे आर्थिक सहाय्य मिळू शकेल असे अहवालासह आलेल्या पत्रकात नमूद केले आहे. संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

---

(पान १ कॉलम ४ वरून)

A whining dog, a twitching eye, a cowing crow, sighting an owl, sighting an elephant, itching palms! So many good and bad omens which we still hear people follow! The probability of these instances occurring often is low, and the after effects of both following or not following these myths may be very inconspicuous. But some of the myths play a very harsh role in our lives and are actually a stigma for many!

A widow is considered inauspicious. She needs to step down on her efforts to look attractive. A woman who cannot give birth is inauspicious! No amount of justification can ever prove this a fact! And women can only change this for themselves by believing that they have every right to live a full life. I used to think that in our well educated and forward thinking society such myths no longer exist, but we women are responsible for allowing them to still dwell in our lives. Even today it is the other women in the house who compel some less fortunate women to follow these sick age old myths arising out of sheer lack of knowledge.

While it is a myth that these myths don't exist in our society, there is one such myth which we all will agree that it sure prevails in many households even today! The famous menstrual taboo! A biological process which graduates a little lady into a mother and presents the family the most beautiful gift of tiny feet that bring in all the happiness and cheer into our homes is still considered a taboo even in educated homes today. I would like to know which God in mythology has verified this myth and asked us ladies to not greet Him when we are in one of those days! How many pickles rot, how much of the food we cook gets polluted and for how many people we are termed a bad omen in our 'those' days has never been verified or even backed up with scientific conclusions. But this taboo is so well ingrained in us that we have been happily allowing people around us to treat us as untouchables and probably we will pass on the same baton to our daughters in the future! That's the unfortunate truth of this real myth!

I found a logical answer to why such a practice of isolating women during their periods began in the first place. I may be wrong, but in comparison to there being no firm logic for following this taboo, I prefer believing the below logic, which makes a lot of sense to me! If amongst our readers we get more such reasonable answers I will be more than happy to know. What I have been told is that, in older times we didn't have a hygienic solution such as a sanitary napkin to allow a clean way of dealing with periods. So the only solution was to keep the ladies away from the routine cooking and holy rituals. Also during menstruation ladies undergo hormonal changes and bleeding can cause weakness and pain. Just as a reason for ladies to get their much deserved rest during this time, isolation was considered a solution. But just as 'the Chinese whispers' this solution slowly converted into a taboo!

Lot of ladies as well as men ask me why I get so furious on this particular issue, if I am not affected by it directly? Well I may not be, but then I know a lot of ladies around me who do have to face this on a regular basis and that affects a lot of people and activities involving them! Some unfortunately themselves believe that they sure are impure in those days and the isolation will help them sustain their equation with God! While some ladies, agree with me, but are helpless about it and prefer keeping silent than revolting. Some men think its none of their business and its too much of a ladies' problem to get them involved in. They think too much is made out of nothing and abstaining yourself from some activities in those days shouldn't make any difference! I wonder what would these men do if they were asked to abstain from the same activities without any logical reasoning! And of course! There are some men who say, if my mother can do it so can my sister and wife and so will my daughter! Now I have a problem with this mindset, where you are regressive yourself, and you continue making your next generation equally regressive until they grow up to find no logic in it and decide to rebel, IF AT ALL THEY REBEL!

I am thankful to two ladies, my mother and grandmother who never allowed this wonderful biological wonder to be treated as a taboo. They informed us of its power and educated us on why the not so aware society treats this wonder as a bad omen.

Today this so called taboo is being extensively researched upon and is used to cure various ailments using the stem cells generated from it. Finally science is proving the 'old wives' wrong! The sooner we start changing our outlook towards these myths the lesser number of people we will hurt. If God's fear is not allowing some of us to change our outlook, then we at least need to figure out what is His will? He says be compassionate towards others. By ill-treating women in the name of God and rituals we are in the process anyway defeating God's will of being courteous and compassionate towards others. Moreover these superstitions are making our society regressive. Where science and technology are cutting their own benchmarks and moving ahead, we are still hanging on to our petty and shameful beliefs. India will need a revolution to change these superstitions. We women need to press the 'reset button' in our brains first to agree to not ill treat anyone in the name of rituals. Only then will we impart the same information to our generation next. Our gen next is aware of their reset button they use it way too often than us! We need to find our own and stomp it as soon as we can!

Thank you.

लेखांक ७

# मनातलं

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

ऑगस्ट महिन्याचं आणि श्रावण महिन्याचं एक अतूट नातं आहे. श्रावण आठवला की बालकवींची 'श्रावणमासी हर्ष मानसी...' ही कविता आठवत नाही असा मराठी माणूस सापडणं अशक्य. निदान आमच्या पिढीचा तरी! अत्यंत सकस साहित्य निर्माण करणाऱ्या लेखकांचं, कवींचं असंच नातं नकळत आपल्या मनात विचारधन भरत असतं. बालकवींनी वर्णिलेला श्रावण हा श्रावणाच्या प्रत्येक वैशिष्ट्याचं यथार्थ दर्शन आपल्या डोळ्यांपुढे साकार करतो. श्रावणातल्या ऊन-पावसाच्या खेळाबरोबरच आठवतात ते सणवार, व्रतवैकल्यं. व्रतं प्रामुख्यानं स्त्रीवर्गाकडूनच केली जातात.

हिंदूधर्मानं ज्या काही गोष्टी अपरिहार्य म्हणून सांगितल्या आहेत त्यांना विज्ञानाची ठाम बैठक आहे. तसंच त्यात आचारविचारांमधलं महत्त्वही सांगितलं आहे. तत्कालीन हिंदूंच्या विज्ञानाच्या प्रगल्भ ज्ञानामुळे हे शक्य झालं होतं. परंतु त्यावेळच्या समाजाच्या सर्व थरांमध्ये सुशिक्षित लोक कमी होते. त्यातही चातुर्वर्ण्य समाजाच्या रूढीनुसार फक्त ब्राह्मण-तेही पुरुषांना; शिक्षणाचा अधिकार होता. म्हणून सर्वसामान्यांपर्यंत हे विज्ञान सहजगत्या पोहोचविण्याचं एकमात्र साधन होतं ते धर्माचं. त्यानुसार काही बाबी शकुन अपशकुन ह्या स्वरूपात तर; काही देवधर्मातून तर; उरलेल्या गोष्टी व्रतवैकल्यांमधून सर्वांच्या मनात रूजविल्या गेल्या. आणि तशा त्या पाळणं हे तत्कालीन समाजाच्या सर्व घटकांसाठी अपरिहार्य ठरलं. मात्र नंतर जसजसा समाज सुशिक्षित होत गेला तसतशा काही श्रद्धा ह्या अंधश्रद्धा ठरू लागल्या. खरं तर श्रद्धा आणि अंधश्रद्धा ह्यामधली सीमारेषा अत्यंत धूसर असते.

श्रद्धेचा अतिरेक ही अंधश्रद्धा ठरते. पण नक्की कोणत्या निकषापर्यंत श्रद्धा मानायची नी नंतरची अंधश्रद्धा ठरवायची हे प्रत्येक मनुष्यप्राणी ज्या प्रकारच्या वातावरणात घडतो, ज्या प्रमाणात त्याच्या घरी सुशिक्षितपणा असतो आणि विचार करण्याची प्रत्येकाची स्वतंत्र ताकद असते, जी त्या त्या व्यक्तिच्या शिक्षणावर आणि त्याच्या व्यक्तिमत्वावर अवलंबून असते, त्यावर अवलंबून असते.

संध्याकाळी दिवेलागणीनंतर कपडे धुवायचे नाहीत ही पूर्वीची श्रद्धा. तसं केलं तर घरात नेहमी आजारपण येतं ही समजूत. हे तेव्हा खरं होतं. कारण विहिरीच्या जवळ कपडे धुतले जात असत. पूर्वी विजेचे दिवे नव्हते. आणि विंचू, साप ह्यांचा वावर अशा ठिकाणी अंधार पडल्यानंतर असण्याची शक्यता खूपच होती. म्हणून तेव्हा कपडे धुणं म्हणजे सापाच्या किंवा विंचवाच्या दंशाला बळी पडणं ठरलेलं होतं. पण नंतर संध्याकाळी नोकरीवरून परतल्यानंतर मोलकरणीनं दांडी मारल्याचं दिसून आल्यावर सकाळी भिजवलेले कपडे धुणं अपरिहार्य ठरतं. तीच कथा संध्याकाळी अळूच्या पानांची भाजी किंवा अळुवड्या करण्याची. तसं कुणीही करीत नसत. कारण अळूची झाडं जिथं असतात, तिथं चिखल,दलदल असते. रात्रीच्या अंधारात अळूची पानं तोडणं म्हणजे त्या चिखलात पाय रुतण्याची शक्यता मोठी होती. मांजर आडवं गेलं तर काम होणार नाही म्हणून तेव्हा सात पावलं मागे जाण्याची प्रथाही अशीच. मांजराच्या मिश्या तशा धोकादायकच असतात. म्हणून मांजरापासून सात पावलं दूर राहण्याचा तो सल्ला होता. एका कुटुंबात मांजर बांधल्याशिवाय घरात कोणतीही मोठी पूजा होत नसे. कारण पंचामृताच्या दुधात मांजर तोंड घालण्याची शक्यता असते. पण नंतर ह्या गोष्टीचं अवडंबर एवढं झालं की त्या कुटुंबाच्या पुढच्या काही पिढ्या ही प्रथा मानून घरात पाळीव मांजर नसेल तर बाहेरून आणून घरात कोणत्यातरी खांबाला किंवा जड वस्तूला पूजा पार पडेपर्यंत मांजर बांधून ठेवत. रात्री पिंपळाच्या पारावर बसायचं नाही कारण त्या झाडावर भूतं असतात ही समजूत. पिंपळाचं झाड हे खूप डेरेदार, भरगच्च पानांचं असतं. म्हणून त्यातून चांदणंसुद्धा झिरपत नाही. अर्थातच तिथं पारावर रात्री बसणं म्हणजे मातीमधल्या मोठ्या लाल मुंग्या चावणं किंवा गडद काळोख त्या भागात असणं क्रमप्राप्तच. तसंच ते पूर्वी गावामधल्या वस्तीपासून दूर असायचं. तेव्हा रात्री काळोखात जाणं जरा अशक्यच हे लक्षात घेता ह्या आणि अशा अनेक समजुती श्रद्धा बरोबर समजून ह्या वर्गवारीत आल्या. स्वयंपाक किंवा पूजा सोवळ्यानं म्हणजे आंघोळ झाल्यावर ओलं वस्त्र नेसून किंवा रेशमी कपड्यावर वातावरणामधली धूळ चिकटून बसत नाही हे शास्त्रीय कारण बाजूलाच राहिलं.

कोणताही मनुष्य कधीच घाबरत नाही हे शक्यच नाही. जेव्हा आपण घाबरतो किंवा एखादं दु:ख आपल्या वाटेवर येताना दिसलं की आपण घरच्यांच्या खांद्यावर आधारासाठी डोकं टेकवतो.जेव्हा सगळं घरच घाबरतं किंवा घरच्यांचा खांदा नसेल तेव्हा आपण देवाचा म्हणजेच श्रद्धेचा खांदा आधारासाठी वापरतो. त्यात काही गैरसुद्धा नाही. पण श्रद्धेचा अतिरेक किंवा श्रद्धेची अंधश्रद्धा तेव्हा होते जेव्हा अक्षरश: बोरिवलीपासून लोक अनवाणी चालत प्रभादेवीच्या सिद्धीविनायकाच्या देवळात पोहोचतात. किंवा भल्या पहाटे निघून लालबागच्या राजापुढे रांगेत उभे राहतात आणि दुसऱ्या दिवशी पहाटे त्यांचा नंबर लागेपर्यंत उपाशीपोटी तसेच उभे असतात.

खरं तर अलीकडेच वाचलं होतं की, संशोधनात असं आढळून आलं आहे की, असं अनवाणी चालल्यामुळे रस्त्यावरच्या धुळीतून काही सूक्ष्म रोगजंतू थेट शरीरात प्रवेश करतात.

व्रतांचंही असंच असतं. व्रत म्हणून उपवास करणारे लोक एकतर खूप कमी खातात किंवा बरेच पदार्थ तुपात शिजवून खातात. दोन्ही अयोग्य. व्रतासाठी उपवास करणं हे शरीरासाठी आरोग्यदायक. पण त्याचा अतिरेक वाईटच. जेव्हा माणसं व्रत करतात तेव्हा त्या व्रताचं उद्दीष्ट सतत त्यांच्या मनात नकळत घडत असते. व्रत करणं फळत नसतं तर त्यावेळचं एकाग्र चित्त उद्दीष्ट साध्य करतं. आपण फक्त उपवास करून नोकरी लागत नाही.त्यासाठी परीक्षा, मुलाखती देणं नी त्यात यश मिळवणं हे अत्यंत गरजेचं असतं. मग उपवास न करतासुद्धा ती तयारी चोख केली आणि मन एकाग्र करून जबर सकारात्मक दृष्टीकोन ठेवला तरी हे साध्य होतं. नुसत्याच उपवासानं घरातलं अत्यंत आजारी माणूस बरं होत नसतं. तर त्याला औषधोपचारांची नितांत गरज असते. पण कधीकधी उपचारानांही रोगी दाद देत नाही तेव्हा डॉक्टर म्हणतात की, देवाची प्रार्थना करा आणि कधी कधी त्यानंतर रोगी बरा होतो. त्यावेळी औषधोपचारांचा योग्य तो चांगला परिणाम होणं सुरू झालेलं असतं आणि प्रार्थना करताना त्या रोग्याच्या घरचे मनापासून देवाची प्रार्थना करतात. म्हणजेच रोगी बरा झालाच पाहिजे ही त्यांच्या मनातील जबरदस्त सकारात्मक भावना काम करते. अर्थात, ह्याचा अर्थ देव नाही असा मुळीच नाही. जेव्हा घरच्यांचाच देवावरचा विश्वासच डळमळीत होतो, तेव्हा त्या व्रतांचा उपयोग होत नाही. किंवा तिथं त्या त्या व्यक्तीचं नशीब काम करतं आणि मग लोक म्हणतात की व्रतात काहीतरी चुकलं किंवा देवाचा कोप झाला. असं काहीही नसतं. मात्र त्याच गोष्टीचा उपयोग करून भोंदू साधू किंवा तथाकथित मांत्रिक फायदा उठवतात आणि आधीच संकटांनी घाबरलेल्या व्यक्तींना अधिकच घाबरवून स्वत:च्या जाळ्यात ओढतात. मग असं जर आहे तर झेपत नसतांना व्रतवैकल्य कशासाठी करायची? एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये एक वयोवृद्धा आय.सी.यु.मध्ये दाखल झाली. महिनाभराचे रोजे ती करीत होती. तो महिना संपायला अर्धा महिना बाकी होता आणि उपवास न झेपल्याने ती बेशुद्ध पडली होती. तिला उपचारांनी शुद्धीवर आणल्यानंतर डॉक्टरांनी तिला बळजबरीनं उपवास मोडायला भाग पाडलं. ज्यांना हे सगळं झेपतं त्यांनी खुशाल ते करावं. कारण कसं वागावं नी काय करावं ह्याला कायद्याच्या कक्षेत पूर्ण स्वातंत्र्य आहे. पण जेव्हा स्वत:ला त्रास करून घेऊन ही व्रतवैकल्यं केली जातात तेव्हा शारीरिक दुखण्याबरोबरच माणसाचं मन दुखावलं जातं. कारण तेव्हा जे पदार्थ खायचे नाहीत ते वारंवार खावेसे वाटतात. आत्मा हा देव ह्या अत्यंत मोठ्या शक्तीचा अंश आहे. तो अशावेळी दुखावला जातो नी म्हणून अशा उपवासाचं फळ कधीही मिळत नाही हे आपल्याला भगवद्‌गीता सांगते.तसंच अत्यंत भक्तिभावानं फक्त एखादं पान किंवा फुलाची पाकळी देवाला वाहिली तरीही देव संतुष्ट होतो हेही गीतेत सांगितलं आहे. त्यातही भक्तिभाव म्हणजेच मनाची एकाग्रता साधणं हा अर्थ अभिप्रेत आहे. म्हणूनच योगसाधनेत ध्यान लावून बसणं ह्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. संमोहित करण्याचं हेच तत्त्व असतं. म्हणूनच प्रत्येकानं स्वत:चं मन खंबीर करायला हवं. ह्या उपवासाचीसुद्धा एक गंमत आहे. आपल्याकडे रव्याचा गोड शिरा किंवा चपाती उपवासाला चालत नाही.पण कारवारकडे हेच पदार्थ उपवासाला खाल्ले जातात. कारण भौगोलिक कारणांमुळे तिथं गव्हाचे पदार्थ नेहमी खाल्ले जात नाहीत. म्हणजेच उपवासाचे पदार्थ हे नेहमीच्या जेवणातील नसावेत हा संकेत आहे आणि उपवासाच्या निमित्ताने शरीराला दुसऱ्या पदार्थातील पोषक द्रव्ये मिळावीत व चवीत बदलही घडावा हा हेतू असतो. उपवासाच्या दिवशी भूक लागली की 'आज उपवास आहे म्हणून अमुकच खायचं' हे लक्षात घेऊन उपवास कशासाठी करतोय ह्याची जबरदस्त जाणीव होते.

मध्ये मध्ये पोटाला विश्रांती हे शरीरशास्त्रानुसार एकदम योग्य; हे लक्षात न घेता 'एवढे उपवास, व्रतं, वैकल्ये सगळं केलं तरी आम्हाला अमुक अमुक भोगावं लागतंय' ही तक्रार प्रचंड वैतागानं केली जाते नी पुढचे उपवास त्याच वैतागानं, विफलता मनात भरून केले जातात.

इथे नकारात्मकता तेवढ्याच प्रचंड प्रमाणात आपल्या आयुष्यात येते नी सकारात्मक पद्धतीनं जगणं मुष्कील होऊन त्रासात भरच पडते. एकच लक्षात ठेवावं की प्रयत्नांना यश देते सकारात्मकता किंवा थोडंफार दैव नी अपयश देते नकारात्मकता किंवा थोडंफार दैव.

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

## प्रभुतरुणाची डायरी

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १०-७-१३ | मालिनी रामराव जयकर | वय ८७ | बोरीवली |
| ११-७-१३ | श्री. पुष्पसेन आनंदराव नवलकर | वय ८७ | पुणे |
| १४-७-१३ | नीलिमा सुभाष नवलकर | वय ६४ | बोरीवली |
| ३१-७-१३ | श्री. उदयसेन नारायण तळपदे | वय ६३ | कांदिवली |
| १०-८-१३ | अलका गणपतराव विजयकर | | भीमराव वाडी, ठाकुरद्वार |

### THE PATHARE PRRABHU CHARITIES
### Award of Educational Merit Prizes For the Year 2013

The Pathare Prabhu Charities have been awarding Educational Merit Prizes every year to students of our community passing various examinations with merit.

Students passing any examination SSC/CBSE/ICSE/IGCSE onward from recognized university/educational institution during this year are earnestly requested to submit the photocopies of their mark sheets in the office of the Pathare Prabhu Charities, Thakurdwar, between 11.00 a.m. and 5.00 p.m. after the result of the examination is declared but not later than **September 14, 2013** to enable the trustees to award the prizes to the eligible students. The students and parents concerned should note that the merit prizes will be awarded by the Trust only on the basis of the results/mark sheets received by the Trust before the dead line.

This year the Annual Eductional Merit Prize Award Function will be held on **Sunday November 24, 2013.**

Students are requested to furnish the following requirements along with the examination results/marks sheet.

1. Full Name of the Student (Married Female to give maiden name also)
2. Latest coloured photo of the student, postcard size with light background.
3. Full Postal Residential Address.
4. Telephone no.
5. Email adress if available.
6. Confirmation regarding student having bank account: Yes/No
7. Name of the Grandfather
8. Bio data in brief (past racord of academic career)
9. Confirmation whether the student will receive the prize if awarded, by his personal attendence at the function on the aforesaid date

## प्रभुतरुणास देणगी

❁ डॉ. गजानन वामनराव विजयकर यांच्या १७ जुलै २०१३ रोजी झालेल्या नव्वदाव्या वाढदिवसा-प्रीत्यर्थ त्यांचे सुपुत्र डॉ. श्री. प्रदीप गजानन विजयकर यांजकडून रु. ३०००/-

❁ सौ. नेत्रा आणि श्री. विनोद माधव प्रभाकर यांजकडून त्यांचा पुत्र श्री. अमेय यांच्या एमएस्सी परीक्षेतील आणि इतर शैक्षणिक क्षेत्रातील उज्ज्वल यशाप्रीत्यर्थ रु. १००१/-

(जागेअभावी श्री. अमेय यांचे शैक्षणिक कर्तृत्व पुढील अंकी)

❁ कै. कुंजविहारी गणपतराव धुरंधर यांच्या स्मरणार्थ श्री. मिथील प्रदीप कुंजविहारी धुरंधर यांजकडून रु. १००१/-

## परीक्षेतील सुयश

**दहावी (SSC)**
श्री. सिद्धेश राजीव तळपदे ८९.२७ %

**बारावी सायन्स**
श्री. अमरीश रोहित जयकर ७५ %

**बारावी**
श्री. प्रतीक प्रकाश विजयकर ९०.१७ %

**बारावी कला**
कु. वैजयंती विश्वास नारायण अजिंक्य ६४.५ %

कु. वैजयंती **बॅचलर ऑफ फाईन आर्ट या पदवीच्या प्रवेश परीक्षेत** महाराष्ट्रातून ६५वी आली.

**सी.बी.एस.सी.**
कु. निकीता महेश जयकर ९५ %

**एमएससी इन क्लोदिंग अँड टेक्स्ट.**
दीप्ती संदीप देसाई, ७०.८९ % 'ए' ग्रेड

**एमएससी (बायोटेक्नॉलॉजी, आयआयटी, मुंबई)**
श्री. अमेय विनोद प्रभाकर, डिस्टिंक्शन, ९.६५ सीपीआय

**एमएससी (फार्मास्युटिकल सिस्टीम मॅनेजमेंट, न्यूजर्सी इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी)**
किरण व्ही. वेलकर

**एमकॉम**
कु. आरती किरण सुरेंद्र व्यवहारकर, द्वितीय वर्ग

**बी.ई. (इलेक्ट्रॉनिक्स)**
मिथील प्रदीप कुंजविहारी धुरंधर, प्रथम वर्ग

**बी.ई. (इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन्स)**
मिथील प्रदीप कुंजविहारी धुरंधर, ७३ % प्रथम वर्ग

श्री. मिथील हे पुढील शिक्षणासाठी, एम्‌एस्‌ करण्यासाठी टोलेडो, युएसए, येथे रवाना झाले. अभिनंदन आणि शुभेच्छा.

## अभिनंदन

❁ 'अक्षरगंध' दिवाळी अंकासाठी काव्य लेखन स्पर्धा घेण्यात आल्या. श्री. अजय धुरंधर यांना या स्पर्धेत प्रथम पुरस्कार प्राप्त झाला.

❁ श्री. जयवंत दळवी वाङ्मय पुरस्कार समितीत प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांची निवड करण्यात आली.

❁ मुंबई विद्यापीठातील मराठी विभाग आणि विसुभाऊ बापट यांच्यातर्फे प्र. के. अत्रे यांच्या नाटकातील स्वगतांची आंतर-महाविद्यालयीन स्पर्धा घेण्यात आली. मीना नाईक, प्रदीप कबरे यांच्यासह सुहासिनी कीर्तिकर यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले.

❁ 'साहित्य' अंकात डॉ. सुमन नवलकरांची कथा प्रकाशित झाली.

❁ कु. अनुष्का आशीष नवलकर हिला दहावीच्या विद्यार्थ्यांकरिता असलेल्या मराठी निबंधस्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे गौरव प्रमाणपत्र प्राप्त झाले.

❁ कु. वैजयंती विश्वास अजिंक्य हिला क्रीडा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे राष्ट्रीय पातळीवर शालेय रायफल शूटिंग स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करून महाराष्ट्र संघाला सुवर्ण पदक मिळवून दिल्याबद्दल २०१२-१३ या कालावधीकरिता रु. ९०००/-ची शिष्यवृत्ती देण्यात आली. 'वैजयंती' हे नाव सार्थकी लावणारा यशाचा चढता आलेख भविष्यात असाच राहो. अभिनंदन

## आवाहन

'प्रभुतरुण'चा यंदाचा दिवाळी अंक 'निसर्ग' या संकल्पनेवर आधारीत आहे. मुंबईतला निसर्ग, प्रवासवर्णन, खगोलशास्त्र, स्वच्छ परिसर, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, नॅचरोपथी, वर्मीकल्चर, घराभोवतालची बाग, समुद्रातले मासेच संपले तर काय होईल?, २०२० साली निसर्गाचे रूप काय असेल?, नेचर पार्क, पर्यावरण आदी अनेक विषयांशी संबंधित कविता, कथा, लेख, विचारमंथन, मुलाखत यांचा समावेश या अंकात असेल. लेखकांनी आपले लेखन १५ सप्टेंबरपर्यंत प्रभुतरुणाकडे कृपया पाठवावे.

*

## चुकीची दुरुस्ती

'परीक्षेतील सुयश' या सदरातील मयुरेश दिलीप वाचकर हे नाव मयुरेश दिलीप वाझकर असे वाचावे.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67